# प्रेस नोट

जा.क्र.स्था.गु.शा/ प्रेस नोट/236/२०२१
पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग
फॅक्स नं. ०२३६२-२२८२०५,
फोन नं. ०२३६२-२२८२०९
दिनांक - २४/०१/२०२१.

## मा. जिल्हा पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग व मा. निवासी उप जिल्हाधिकारी यांचे कडुन बॉम्ब शोध व नाश पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री. अवधुत बनकर यांचा सत्कार

महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता पोलीस अकादमी, पुणे येथे दिनांक ११.०१.२०२१ ते दिनांक २२.०१.२०२१ या कालावधीत महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयातील पोलीस अधीकारी यांचेसाठी बॉम्ब शोध व नाश बाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले होते.

सदर प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयामधुन ५३ पोलीस अधिकारी यांची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेली होती. सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलातील (BDDS) बॉम्ब शोध व नाश पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री. अवधुत बनकर यांची निवड करण्यात आलेली होती. सदर प्रशिक्षण कालावधी पुर्ण झाल्यानंतर वरिष्ठ अधिकारी यांचेकडून सर्व प्रक्षिणार्थी पोलीस अधिकारी यांची , लेखी तसेच विविध प्रात्याक्षिकासह अतीशय कठीण स्तरावर परीक्षा घेण्यात येते. सदर परीक्षामध्ये प्रात्याक्षिमध्ये जास्तीत जास्त भर देण्यात येतो. सदर प्रशिक्षणाअंती घेण्यात आलेल्या परीक्षामध्ये महाराष्ट्रातील सर्व पोलीस अधिकारी यांचेमधुन सिंधुदुर्ग जिल्हयातील पोलीस उपनिरीक्षक श्री. अवधुत बनकर यांनी यशस्वीपणे प्रशिक्षण पुर्ण करुन त्यांचा सर्व प्रक्षिणार्थी यांचेमध्ये त्यांनी महाराष्ट्र राज्यात दुसरा क्रमांक पटकावुन त्यांनी सिंधुदुर्ग जिल्हयाचे नांव उज्जल केल्यामुळे आज दिनांक २४/०१/२०२१ रोजी मा. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री. राजेंद्र दाभाडे व मा. निवासी उप जिल्हाधिकारी श्रीमती शुभांगी साठे यांचे उपस्थितीत श्री. अवधुत बनकर, पोलीस उपनिरीक्षक (BDDS) शाखा सिंधुदुर्ग यांचे पोलीस मुख्यालय सिंधुदुर्ग येथील पोलीस परेड ग्राऊंड येथील कवायत मैदान येथे अभिनंदन करुन पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन गौरविण्यात आलेले आहे.

( बी. ए. सुतार )
सहा. पोलीस निरीक्षक,
प्र. पोलीस अधिकारी, सिंधुदुर्ग

मा. जिल्हा माहिती अधिकारी
सिंधुदुर्ग